**ठळक बातम्या**

- शाळा, महाविद्यालयात सहकार आधारित अभ्यासक्रम सुरू करण्याची प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची सूचना

- AI कोश, AI Compute या वेबसाइटचं केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या हस्ते अनावरण

- राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ कार्यकर्ते भैय्याजी जोशी यांनी मराठीच्या संदर्भात केलेल्या वक्तव्याचे विधीमंडळात पडसाद, जपानमध्ये राज्य सरकार सुरू करणार मराठी ग्रंथालय

**आणि**

- बोगस कंपन्यांकडून होणारी नागरिकांची फसवणूक टाळण्यासाठी राज्य सरकार महाराष्ट्र इंटेलिजेन्स युनिटची स्थापना करणार

**<><><><><>**

देशातल्या शाळा, महाविद्यालयांमधे सहकार क्षेत्राशी संबंधित अभ्यासक्रम सुरू करावे. तसंच भावी पिढ्यांना प्रेरणा देण्यासाठी सहकारी संस्थांना प्रोत्साहन देणं गरजेचं असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. देशातल्या सहकार क्षेत्राच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी आयोजित बैठकीत ते आज बोलत होते. देशातल्या सहकार क्षेत्राचा विकास करण्यासाठी जागतिक पातळीवरच्या सहकारी संस्थांशी सहकार्य वाढवण्यावर भर देण्याची गरज प्रधानमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केली. सहकारी संस्थांच्या माध्यमातून सेंद्रिय उत्पादनांना प्रोत्साहन देणं गरजेचं असल्याचं ते म्हणाले. युपीआयला रूपे आणि किसान क्रेडिट कार्डशी संलग्नित करणं आर्थिक

व्यवहार सुलभ करण्यासाठी महत्वाचं असल्याचं मोदी यांनी सांगितलं. या बैठकीला केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांच्यासह उच्चपदस्थ अधिकारी उपस्थित होते.

<><><><><>

माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी 'द डिजिटल पाथ टू अ डेव्हलपमेंट इंडिया' या राष्ट्रीय दैनिकात लिहिलेल्या लेखाचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी कौतुक केलं आहे. डिजिटल पब्लिक इन्फ्रास्ट्रक्चर, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, सेमीकंडक्टर आणि इलेक्ट्रॉनिक्स मॅन्युफॅक्चरिंग वर भर देत देश आपलं डिजिटल भवितव्य कसं घडवत आहे याची सविस्तर माहिती या लेखात देण्यात आली आहे.

<><><><><>

AI अर्थात Artificial Intelligence साठीचा AI कोश, AI Compute या वेबसाइटचं अनावरण केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज नवी दिल्लीत केलं. AI कोश च्या माध्यमातून विविध डेटा, टूल्स आणि AI मॉड़ेल्स संगणक तंत्रज्ञांना उपलब्ध होती. AI COMPUTE या वेबसाइटवर GPUs आणि इतर क्लाऊड सुविधा विद्यार्थी, स्टार्टअप, संशोधक आणि सरकारी विभागांना उपलब्ध होतील. सार्वजनिक क्षेत्रातल्या कर्मचाऱ्यांसाठी i Got पोर्टलवर AI चा उपयोग करुन विविध अभ्यासक्रम सुचवण्याच्या सुविधेची सुरुवातही त्यांनी केली.

<><><><><>

'नारी शक्ती सह विकसित भारत' या संकल्पनेवर आधारित यंदाचा महिला दिन साजरा करण्यात येणार असल्याची घोषणा केंद्रीय महिला आणि बालकल्याण मंत्री अन्नपूर्णा देवी यांनी आज केली. या निमित्ताने नवी दिल्ली इथं विज्ञान भवनात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थितीत एका परिसंवाद होणार आहे. यंदाच्या महिला दिनाची संकल्पना सर्व महिला-मुलींसाठी - हक्क, समानता आणि सबलीकरण अशी आहे.

महिलांनी आर्थिक, सामाजिक, राजकीय, राष्ट्रीय तसंच वांशिक, भाषिक आणि सांस्कृतिक सीमा ओलांडून दाखवलेल्या कर्तृत्वाचा गौरव करण्यासाठी यंदा या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. सरकार विविध धोरणं आणि योजनांच्या माध्यमातून महिला सबलीकरण आणि लिंगभाव समानतेसाठी काम करत असल्याचंही त्या म्हणाल्या.

**<><><><><>**

नवी दिल्लीत संसद भवनात आज नव्या प्राप्तिकर विधेयकावर संसदीय समितीची बैठक झाली. समितीनं अर्न्स्ट अँड यंग सह इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडियाच्या प्रतिनिधींनी समितीसमोर सादरीकरण केलं.

**<><><><><>**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ कार्यकर्ते भैय्याजी जोशी यांनी मराठीच्या संदर्भात केलेल्या वक्तव्याचा मुद्दा आज विधीमंडळात गाजला.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते भास्कर जाधव यांनी विधानसभेत हा मुद्दा उपस्थित केला. याबद्दल सरकारची भूमिका स्पष्ट करण्याची मागणी त्यांनी केली. यावर मुंबई आणि महाराष्ट्राची भाषा मराठीच असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केलं.

महाराष्ट्रात राहणाऱ्या प्रत्येकाला मराठी भाषा आली पाहिजे ,शिकली पाहिजे आणि शिक्षणही मराठीत घेतलं पाहिजे हीच राज्य सरकारची भूमिका आहे, असं मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितलं. भय्याजी जोशी यांच्या वक्तव्याचा विपर्यास झाल्याचं ते म्हणाले. या मुद्द्यावरुन महाविकास आघाडीच्या आमदारांनी दुपारी हुतात्मा स्मारकाला अभिवादन करुन आंदोलन केलं.

जोशी यांच्याविरोधात राजद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केली.

विरोधकांना या मुद्द्यावरुन राजकारण करायचं आहे. कुणीही मातृभाषेचा अवमान करु नये ही सरकारची भूमिका आहे, असल्याचं मराठी भाषा मंत्री उदय सामंत विधान भवन परिसरात म्हणाले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावे परदेशातलं पहिलं मराठी ग्रंथालय जपानमध्ये सुरू होत असल्याची माहिती त्यांनी दिली.

मराठी ही महाराष्ट्राची आणि मुंबईची भाषा आहे यात दुमत नाही, आणि बाहेरुन आलेल्यांना ती समजायलाच हवी असं राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे नेते भैयाजी जोशी यांनी म्हटलं आहे. मुंबईत मराठी भाषा येण्याविषयी

आपल्या विधानाचा विपर्यास केला जात असल्याचं ते म्हणाले. मराठी ही आपली स्थानिक भाषा असून त्याचा आपल्याला अभिमान असल्याचं ते म्हणाले.

**<><><><><>**

राज्यात आर्थिक गुंतवणुकीच्या व्यवहारासाठी येणाऱ्या कंपन्या खऱ्या आहेत की फसव्या हे तपासण्यासाठी आणि भविष्यात टोरेस कंपनीसारखे आर्थिक गुन्हे होऊ नयेत यासाठी महाराष्ट्र इंटेलिजेन्स युनिटची स्थापना करण्यात येणार असल्याची घोषणा गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी विधानपरिषदेत केली. टोरेस कंपनीकडून झालेल्या गुंतवणूकदारांच्या फसवणुकीबद्दल राष्ट्रवादी काँग्रेसचे विक्रम काळे यांनी मांडलेल्या लक्षवेधी सूचनेला ते उत्तर देत होते. टोरेस प्रकरणी आतापर्यंत ७ जणांना अटक झाली आहे. या कंपनीनं १६ हजार ७८६ जणांची सुमारे अडीच हजार कोटी रुपयांची फसवणूक केली असून ४९ कोटी २ लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असल्याची माहिती कदम यांनी दिली.

गृह प्रकल्पांमध्ये विकासकांकडून फसवणूक झालेल्या १ हजार १२४ प्रकरणांमध्ये कठोर कारवाई करत रेरा कायद्या अंतर्गत वसुली करून सदनिका धारकांना येत्या तीन महिन्यात नुकसानभरपाई दिली जाईल, अशी माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज विधानपरिषदेत दिली.

**<><><><><>**

आगामी दोन वर्षात केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलात २० हजारांहून अधिक कर्मचाऱ्यांची भरती होणार असल्याची माहिती महासंचालक राजविंदर सिंग भट्टी यांनी दिली. ते चेन्नईत बोलत होते.

माऊंट एव्हरेस्ट चढाई करण्यासाठी दलाच्या महिलांचं प्रशिक्षण सुरू आहे. तसंच सुरक्षेसंदर्भातील आधुनिक आव्हानांना तोंड देण्यासाठी योग्य ती पावलं उचलली जात असल्याचंही त्यांनी यावेळी सांगितलं.

**<><><><><>**

देशातल्या नागरिकांच्या स्थलांतरावर आणि धर्मांतरावर उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी टीका केली आहे. या मुद्द्यांकडे लक्ष दिलं नाही तर आपलं अस्तित्व धोक्यात सापडेल असा इशारा त्यांनी दिली. मुंबईत मुरली देवरा स्मृती संवाद कार्यक्रमात ते बोलत होते.
लोकशाहीमध्ये संवाद आवश्यक असल्याची गरज त्यांनी पुन्हा अधोरेखित केली. देशातल्या अनेक संस्थांचं खच्चीकरण होत आहे.

**<><><><><>**

लोकसभेतले विरोधी पक्ष नेते आणि काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी मुंबईतल्या धारावीला आज भेट दिली. धारावी इथं असलेल्या चमार स्टुडिओला भेट देत कारागिरांशी संवाद साधला.

धारावीत उद्योग-व्यवसाय करणाऱ्यांनी सर्वसमावेश उत्पादन साखळीच्या निर्मितीवर भर द्यावा, असा आग्रह राहुल गांधी यांनी केला. चमार स्टुडिओ हे त्याचे उत्तम उदाहरण असल्याचंही गांधी यांनी सांगितलं.

**<><><><><>**

झारखंडचे माजी मुख्यमंत्री आणि भाजपचे प्रदेशाध्यक्ष बाबुलाल मरांडी यांची आज विधिमंडळ पक्षनेते म्हणून पुन्हा निवड झाली. केंद्रीय पर्यावरण, वन

आणि हवामान बदल मंत्री भूपेंद्र यादव आणि खासदार के लक्ष्मण यांनी मरांडी यांच्या नावाची घोषणा केली.

**//<><><><><>//**